Scan QR code to visit... Epaper Portal

www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २३३ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.३ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### बाळासाहेब थोरातांना दुसऱ्याची तळी उचलण्यात धन्यता

**अहमदनगर–**बाळासाहेब थोरात यांना दुसऱ्याची तळी उचलण्यात धन्यता आहे. मात्र त्यांनी स्वतःच्या अस्तित्वाची काळजी करावी असा टोला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांना लगावला आहे. तसेच अहमदनगरची जागा आम्ही मोठ्या मताधिक्याने जिंकणार असा दावाही त्यांनी केला आहे.बाळासाहेब थोरात आणि महा विकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्यावर विखे यांनी टीका केली आहे. विखे म्हणाले, ''पक्षासाठी काम करण्यापेक्षा, व्यक्तिद्वेषाने पछाडलेली ही माणसं आहेत. बाळासाहेब थोरात यांनी थोडी तरी शरम बाळगली पाहिजे, स्वतःला काँग्रेस नेते समजतात, मात्र पक्षाला एकही जागा घेऊ शकले नाही. तसेच दुसऱ्याची तळी उचलण्यामध्ये ते धन्यता मानतात. यातूनच त्यांची वैचारिक दिवाळखोरी सिद्ध होते'', असे टीका विखेंनी केली आहे.

### पक्ष फोडणाऱ्यांना जनता गाडल्या शिवाय राहत नाही

**मुंबई–**मोदी सत्तेत येत आहेत याचा २ दिवस आनंद घेत आहेत, ४ ला सगळे स्पष्ट होईल असे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांना टोला लगावला आहे. लोकसभा निवडणुकीचे एक्सिट पोल समोर आले आहेत. यामध्ये भाजपला जास्त जागा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये कांटे की टक्कर झाल्याचे चित्र आहे. यावरूनच आज प्रसार माध्यमांशी बोलताना विजय वडेट्टीवार यांनी भाजपसह सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे.वडेट्टीवार म्हणाले, ''हा एक्झिट पोल आहे. निकाल येईल तेव्हा मोदी सरकार बदललेले दिसेल. १० पैकी ८ लोक मोदींच्या विरोधात बोलताना दिसतात. १० वर्षे जनतेने सरकारचा त्रास सहन केला. विकासाची निवडणूक हरतो आहे म्हणून धर्मावर नेली, एक्झिट पोलचे निकाल बदललेले दिसतील'', असे वडेट्टीवार म्हणाले. तसेच भाजपचा पराभव निश्चित असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

### ७–८ जूनला मान्सून तळकोकणात दाखल होणार

**मुंबई–**नुकतेच मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. त्यानंतर राज्य मान्सूनची प्रतीक्षा आहे. आता येत्या ७ ते ८ जूनला मान्सून तळकोकणात दाखल होणार असल्याचा अंदाज आहे. तसेच पुढील दोन दिवस राज्यात आता मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मराठवाडा, कोकण, मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली होती. अनेक जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. मात्र आता राज्यात पावसाचा अंदाज असल्याने काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यातच येत्या २ ते ३ दिवसात मान्सून कर्नाटकात पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर ७ ते ८ जुनपर्यंत मान्सून राज्याच्या प्रवेशद्वार असलेल्या सिंधुदुर्गात दाखल होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे

### वर्षा गायकवाड यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता

**मुंबई–**महाविकास आघाडीच्या मुंबई उत्तर-मध्यमधील उमेदवार आणि काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. भाजपकडून त्यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. उज्वल निकम यांच्याविरोधात वर्षा गायकवाड यांनी खोटा प्रचार केला, असा आरोप भाजपकडून करण्यात आला आहे.

# लोकसभेचा निकाल लागताच भाजपमध्ये मोठे फेरबदल?

**मुंबई (वृत्तसंस्था)–लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपमध्ये मोठे फेरबदल होणार असल्याची माहिती आहे. भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी नड्डा याचा कार्यकाळ ६ जून रोजी संपणार आहे. त्यांच्या जागी नवीन अध्यक्ष नेमले जाणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.दरम्यान निकालानंतर सध्याच्या सत्ताधारी भाजप पक्षातही मोठे बदल होणार आहेत. पक्षात राष्ट्रीय पातळीवर झाल्यास महाराष्ट्रातही भाजपत संघटनात्मक पातळीवर बदल होण्याची शक्यता आहे. नवीन राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नेमकी कोणाची वर्णी लागणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.**



## नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळण्याची शक्यता, विनोद तावडेंची वर्णी लागणार का?

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांचा कार्यकाळ यावर्षी जून महिन्यात संपणार आहे. त्यांचा कार्यकाळ गेल्यावर्षी जुनमध्येच संपला होता. मात्र, लोकसभा निवडणूक लक्षात घेता त्यांना १ वर्ष मुदतवाढ दिली होती. भाजपच्या पक्ष घटनेनुसार, अध्यक्षांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच नव्या अध्यक्षांची नियुक्ती केली जाते. नव्या अध्यक्षांनी पदभार सांभाळल्यानंतर संघटनेतील पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. त्यामुळे आता अध्यक्ष बदलल्यावर पदाधिकारीही बदलले जातील.भाजप अध्यक्षपदाच्या शर्यतीत केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचे नाव सर्वात पुढे आहे. यादव हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अतिशय जवळचे मानले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही भूपेंद्र यादव यांच्यावर विश्वास आहे. केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाल्यास अध्यक्षपदी भूपेंद्र यादव यांचीच वर्णी लागण्याची शक्यता आहे. अध्यक्ष पदासाठी महाराष्ट्रातील एका नेत्याचंही नाव चर्चेत आहे. ते म्हणजे विनोद तावडे त्यांच्यावर लोकसभेत मोठी जबाबदारी देण्यात आली होती. तर ते अमित शहा यांच्या विश्वासातील नेते म्हणूनदेखील परिचित आहेत. भाजपच्या नव्या अध्यक्षपदासाठी आता निवडणूक होणार नाही. पक्षाच्या संसदीय मंडळाकडून नव्या अध्यक्षांची निवड केली जाणार आहे.

# पोहायला गेलेल्या युवकांचा खड्ड्यात बुडून मृत्यू

**चंद्रपूर | प्रतिनिधी**


दुर्गापूर येथील तनवीर शेख वय १९ वर्ष हा लालपेठ कॉलरी क्रमांक २ मध्ये आपल्या मित्राला भेटण्यासाठी गेला असता त्या भागात वेकोली व वनविभागाच्या जागेत खोदलेल्या एका ४०–३० चौरस फूट आराजी असलेल्या खड्ड्यात उष्णतेच्या तीव्रतेने थंडीचा आंनद घेण्यासाठी मित्रांसोबत पोहायला गेला असता त्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना दुपारी १ ते १.३० ची असून मृतदेह शोधण्यासाठी चंद्रपूर मनपाच्या रेस्क्यू ऑपरेशन करणाऱ्या बोटीच्या साहाय्याने तब्बल तीन तासानंतर मृतदेह हाती लागला. या घटनेने सर्वत्र शोक व्यक्त होतं आहे, मात्र एवढा मोठा खड्डा खोदताना वनविभागाने त्या खड्ड्याच्या सभोंवताला कुंपण घातले नसल्याने ही दुर्दैवी घटना घडली त्यामुळे वन विभागाकडून मृतक च्या कुटुंबियांना नुकसान भरपाई



मिळाली पाहिजे अशी मागणी होतं आहे.

शहरातील लालपेठ कॉलरी नंबर दोन मध्ये खुली जागा असून तिथे वनविभागाने वृक्षारोपण कार्यक्रमाअंतर्गत जवळपास एक हेक्टर जागेवर झाडे लावण्याचे काम हातात घेऊन भूमिगत कोळसा खान बुजाविण्याच्या कार्यात रेती व माती जी टाकल्या जाते त्यात पाणी पण सोडल्या जाते ते पाणी साठवणूक करून त्या पाण्याच्या माध्यमातून झाडे जगविण्यासाठी मोठा खड्डा खोदला होता त्या खड्ड्यात पाणी असल्याने दुर्गापूर येथील काही युवक जे लालपेठ कॉलरी येथे आले होते त्यांना पोहण्याचा मोह झाला आणि त्यांनी पाण्यात उडया मारल्या दरम्यान काही युवक बाहेर आले पण एक युवक तनवीर शेख हा खड्ड्यात बुडाला आणि त्यातच त्यांचा अंत झाला, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होतं आहे.

# मद्यपाश एक जीव घेणारा आजार यावर समर्पण समुह वरोरा चा सहावा वर्धापन दिन संपन्न




**वरोरा | प्रतिनिधी**

अल्कोहोलिक्स अनॉनिमस समर्पण समुह, वरोरा चा सहावा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समूहाच्या वतीने स्थानिक नेहरू उर्दू शाळा, वरोरा येथे 'मद्यपाश एक जीव घेणारा आजार' या विषयावर वर्धापन दिनाचे आयोजन रविवार दिनांक २ जून २०२४ ला करण्यात आले होते.या सभेला मार्गदर्शक म्हणून डॉ. हेमंत खापने, वरोरा, डॉ. दिलीप बुराडे, जनरल मॅनेजर, सुरजागड माइन्स, शुभचिंतक व ए ए मित्र हे हजर होते.

सदर वर्धापन दिनामध्ये डॉ. दिलीप बुराडे, यांनी प्रतिपादन केले की, समाजाला अल्कोहोलिक्स अनॉनिमस या संघटनेची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे, तसेच डॉ. हेमंत खापने, वरोरा, यांनी सुद्धा प्रतिपादन केले की, दारू ही आपल्या कुटुंबाला फार मोठ्या प्रमाणात त्रास देत असते तसेच सदर अल्कोहोलिक्स अनॉनिमस या संघटनेशी संबंध राहील असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.सदर वर्धापन दिनाला अनेक बांधव, कुटुंबिय व नागरिक हजर होते.

# यळकोट यळकोट जय मल्हार घोषणाने वरोरा नगरी दुमदुमली



**वरोरा | प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव समिती वरोरा तर्फे २९९ वी अहिल्यादेवी जयंती उत्सव अहिल्यादेवी वृद्धाश्रम बोर्डा, वरोरा येथे साजरी करण्यात आली.

प्रथम सकाळी आनंदवन चौकातून यळकोट यळकोट जय मल्हार घोषणाबाजीने संपूर्ण वरोरा शहरात बाईक रॅली काढण्यात आली.

यावेळी रॅलीत विशेष आकर्षण म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची वेशभूषा करण्यात आली. या कार्यक्रमाला जयंतीच्या सोहळ्याचे उदघाटन साईनाथ बुच्चे, होते तर अध्यक्षस्थानी डॉ सरवदे, होते प्रमुख उपस्थिती कैलास उराडे, वामन तुरके, बाळासाहेब पडवे, डॉ. प्रफुल खुजे, सोनूताई येवले, मुकेश जिवतोडे उपस्थित होते.

याप्रसंगी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला माळ्यार्पण करून कार्यक्रमाला सुरवात केली. प्रमुख पाहुण्यांना अहिल्यादेवी होळकर यांच्या जिवन कार्याला उजाळा दिला. अहिल्यादेवी यांनी राज्य कारभार कसा चालवला, शेतकऱ्यांनसाठी किती धोरणे आणली, हिंदू मंदिराचा जीर्णोद्धार कसा केला, अहिल्यादेवीना समाजात देवीचे स्थान कसे प्राप्त झाले, या बाबतची सविस्तर मार्गदर्शन उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी भाषणा द्वारे अहिल्याभक्त व धनगर समाज बांधवाना सांगितली. यावेळी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव समितीच्या वतीने गुणवंत विद्यार्थीचा सत्कार सुष्ट्री बारतीने, जानव्ही तुराळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रफुल खुजे यांचा सत्कार करण्यात आला. राजकीय सत्कार वामन तुरके व विलास झिले यांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.तसेच अहिल्यादेवी यांचे वेशभूषा साकार केलेल्या इशिता विलास काळे व किमया सचिन मुंगल यांचा अहिल्यादेवी ची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीचे संस्थापक संजय बोधे, संचालन उत्सव समितीचे आयोजक गणेश चिडे, आभार प्रदर्शन आशिष शेळकी तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्सव समितीचे अध्यक्ष शिरीष उगे, कोषाध्यक्ष भूषण झिले, उपाध्यक्ष अजिंक्य काळे, कुसुम वैद्य, छाया धवणे, नितीन भोजेकर यांनी केले व कार्यकमाला वरोरा तालुक्यातील समाज बांधव उपस्थित होते.

# ९ जुन ला यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

सीबीएससी व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत इयत्ता १० वी आणि १२ वी चा निकाल नुकताच जाहीर झाला असून यात प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने ९ जुन २०२४ रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे सायंकाळी ५ वाजता सत्कार करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार. या कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहण यंग चांदा ब्रिगेडच्या शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा १० वी आणि १२ वीच्या परिक्षेत यश संपादन करणा-या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन यंग चांदा ब्रिगेडच्या शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. या सत्कार कार्यक्रमात १२ वी च्या परीक्षेत ७५ टक्के च्या वर गुण प्राप्त करणाऱ्या आणि १० वी च्या परिक्षेत ८० टक्के च्या वर गुण प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यासाठी सदर गुणवंत विद्यार्थ्यांना जैन भवन जवळील आमदार किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात दि. ८ जून २०२४ पर्यंत गुणपत्रिकेची प्रत जमा करावी किंव्हा https://bit.ly/4bF3655 या संकेत स्थळावर नोंदणी करून घ्यावी असे आवाहण यंग चांदा ब्रिगेडच्या शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाला गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक वृंद, शाळा संस्थापक अध्यक्ष तसेच महानगरातील विविध क्षेत्रातील नागरिक व शिक्षण क्षेत्राशी निगडीत मान्यवर व नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे.



**सध्या शेतीचा हंगाम जवळ आला असुन शेतकरी बळीराजा आपापल्या शेतीची मशागत करून साफसफाई करत आहेत. अशात एका शेतात मशागतीसाठी शेतकऱ्याने लावलेली आगीचे टिपलेले छायाचित्र. छाया : प्रणय बांगरे.**

## अरुण भोले यांचे निधन

**तळोधी (बा) | प्रतिनिधी**

नागभीड तालुका पत्रकार संघांचे सचिव अरुण



रामूजी भोले (वय – ४५ वर्ष )यांचे आज (दि.२जून )सायंकाळी ५.००वाजता हृदय आघाताने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, आई वडील असा आप्त परिवार आहे. त्यांचे पार्थिवावर दि.३जून ला सकाळी ९.००वाजता नागभीड येथील हिंदू स्मशान भूमीत अंत्यविधी पार पडणार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त केली जात आहे.तळोधी (बा )ग्रामीण पत्रकार संघ, नागभीड पत्रकार संघ तसेच सह्यांद्रीचा राखणदार परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

# रोमन कॅथॉलिक धर्मगुरूचे शिक्षण!

**जॉर्ज मॅथ्यू फर्नांडिस कामगारनेते, पत्रकार आणि संसदपटू असलेले जॉर्ज फर्नांडिस भारताच्या समाजवादी चळवळीतील महत्त्वाचे नेते आहेत. ते जनता दल (संयुक्त) पक्षातील एक ज्येष्ठ होते. याशिवाय त्यांनी १९९४ साली नितीश कुमार ह्यांच्या सोबत समता पक्षाची स्थापना केली होती. केंद्रीय मंत्री या नात्याने उद्योग, रेल्वे आणि संरक्षण या खात्यांसह अनेक खात्यांचा कार्यभार त्यांनी सांभाळला आहे. त्यांच्याबद्दल महत्वपूर्ण संकलित माहिती घऋछ – श्री के. जी. निकोडे गुरूजींच्या याच लेखात.... संपादक.**

जॉर्ज फर्नांडिस यांचा जन्म दि.३ जून १९३०ला जॉन जोसेफ फर्नांडिस आणि एलिस मार्था फर्नांडिस या धार्मिक वृत्तीच्या मध्यमवर्गीय मंगलोरी कॅथॉलिक ख्रिश्चन दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे वडील एका खाजगी विमा कंपनीत अधिकारी होते. सहा भावंडांमध्ये जॉर्ज सर्वात मोठे होते. त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सोळाव्या वर्षी त्यांना रोमन कॅथॉलिक धर्मगुरू होण्याचे शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले. मात्र जॉर्ज यांनी ते पूर्ण करण्याऐवजी, वयाच्या १९व्या वर्षी मंगलोरमधील हॉटेल आणि वाहतूक व्यवसायातील कामगारांची संघटना बांधण्याचे काम केले. ही त्यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होती. सन १९४९मध्ये जॉर्ज नोकरीच्या शोधात मुंबईत आले. तेथे त्यांचे सुरुवातीचे दिवस अत्यंत खडतर गेले. पुढे कामगार नेते डिमेलो आणि समाजवादी विचारवंत राम मनोहर लोहिया यांच्या संपर्कात ते आले, त्यांचा जॉर्ज यांच्या विचारांवर आणि जीवनावर मोठा प्रभाव पडला.जॉर्ज फर्नांडिस सर्वप्रथम इ.स.१९६७मध्ये दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून कॉंग्रेसचे पक्षाचे ज्येष्ठ नेते स.का.पाटिल यांचा पराभव करून लोकसभेत प्रवेश केला. मात्र इ.स.१९७१च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. इंदिरा गांधी सरकारला त्यांनी कडाडून विरोध केला. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एकमेव रेल्वे कर्मचारी संपाचे त्यांनी इ.स.१९७४मध्ये नेतृत्व केले. आणीबाणीच्या कालावधीत एक आरोपी म्हणून त्यांनी तुरुंगवासही भोगला. इ.स. १९७७ साली मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेल्या जनता सरकारमध्ये त्यांनी उद्योगमंत्री म्हणून काम बघितले. जुलै १९७९ मध्ये लोकसभेत कॉंग्रेस नेते यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेल्या अविश्वास ठरावावर त्यांनी जनता सरकारच्या बाजूने प्रभावी भाषण केले पण दुसऱ्या दिवशीच पंतप्रधान मोरारजी देसाईंच्या नेतृत्वावर आपला विश्वास राहिला नाही असे जाहीर करून मंत्रीमंडळातून राजीनामा दिला. इ.स.१९८४च्या निवडणुकीत त्यांचा मंगलोर लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला. पण इ.स.१९८९मध्ये ते बिहार राज्यातील



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

मुझफ्फरपूर लोकसभा मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर लोकसभेवर निवडून गेले. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात स्थापन झालेल्या संयुक्त आघाडी सरकारमध्ये ते रेल्वेमंत्री होते. इ.स.१९९१च्या लोकसभा निवडणुकांतही त्यांनी मुझफ्फरपूर लोकसभा मतदारसंघातून जनता दलाचे उमेदवार म्हणून विजय मिळवला. इ.स.१९९४ मध्ये बिहार राज्याचे मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्याशी झालेल्या मतभेदांमुळे त्यांनी आणि जनता दलाच्या नितीश कुमार आणि रवी रे यांच्यासारख्या नेत्यांनी समता पक्ष या स्वतंत्र पक्षाची स्थापना केली.इ.स. १९९६च्या लोकसभा निवडणुकीसाठी समता पक्षाने भारतीय जनता पक्षाबरोबर युती केली. फर्नांडिस यांनी बिहारमधील नालंदा मतदारसंघातून विजय मिळवला. पुढे इ.स.१९९८ आणि इ.स.१९९९च्या लोकसभा निवडणुकींत त्यांनी नालंदा मतदारसंघातूनच विजय मिळवला. इ.स.१९९९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी समता पक्ष आणि रामकृष्ण हेगडे यांचा लोकशक्ती या पक्षांचे विलीनीकरण होऊन जनता दल (संयुक्त) हा नवा पक्ष अस्तित्वात आला. इ.स.१९९८मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या भाजप आघाडी सरकारमध्ये त्यांनी संरक्षणमंत्री म्हणून काम बघितले. इ.स. २००१ मध्ये त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. त्यामुळे ते मार्च ते ऑक्टोबर २००१ मंत्रिमंडळाबाहेर होते. पण ऑक्टोबर २००१मध्ये त्यांची परत संरक्षणमंत्रीपदी नेमणूक झाली. इ.स.२००४च्या लोकसभा निवडणुकीत जॉर्ज फर्नांडिस यांनी बिहार राज्यातील त्यांच्या पूर्वीच्या मुझफ्फरपूर मतदारसंघातून विजय मिळवला. नंतरच्या काळात ते आजारपणामुळे लोकसभेत फारसे सक्रीय राहिले नाहीत. त्यांना इ.स.२००९च्या लोकसभा निवडणुकीत जनता दल (संयुक्त) पक्षाने तिकीट नाकारले. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर पक्षनेतृत्वाबरोबरचे त्यांचे मतभेद मिटले आणि ते राज्यसभेत पक्षातर्फे बिहारमधून निवडून गेले. त्यांचे दि.२९ जानेवारी, इ.स.२०१९ रोजी स्वाइन इन्फ्लुएन्झा झाल्याच्या कारणाने नवी दिल्ली येथे निधन झाले. इ.स.२०२०चा मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ रोजी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबियांना प्रदान करण्यात आले.
!! पावन जयंतीनिमित्त जॉर्ज फर्नांडिस साहेबांना अनेक विनम्र अभिवादन जी !!

# जयंत पाटील भाजप किंवा कॉंग्रेसच्या वाटेवर?:दरेकरांचा दावा

## तर हायकमांडच्या निर्णयाचे स्वागत करू, नाना पटोलेंचेही सूचक विधान

**मुंबई (वृत्तसंस्था)**–जयंत पाटील भाजप किंवा कॉंग्रेसमध्ये जाऊ शकतात असा मोठा दावा भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी केला आहे. शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनीही असा दावा केला आहे. त्यानंतर कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही हायकमांडच्या निर्णयाचे स्वागत करण्यासंबंधीचे सूचक विधान केल्यामुळे जयंत पाटील खरेच शरद पवारांची साथ सोडणार काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.
आता दरेकर यांच्या गौप्यस्फोटाने खळबळ उडाली आहे. दारे म्हणाले, ''जयंत पाटील हे यापूर्वीच पक्ष सोडून भाजप किंवा कॉंग्रेससोबत जातील असे चित्र होते. शरद पवारांच्या पक्षाचे भविष्य त्यांना माहित



आहे. त्यामुळे पक्ष सोडण्याबाबतचा निर्णय जयंत पाटील घेऊ शकतात'', असा दावा दरेकरांनी केला आहे. यापूर्वी देखील जयंत पाटील हे शरद पवार यांची साथ सोडणार असल्याचे बोलले जात होते. मात्र त्यावेळी जयंत पाटील यांनीच हा दावा फेटाळून लावला होता.याबाबत आमदार संजय शिरसाट यांनी देखील भाष्य करत दरेकर यांच्या दाव्याला दुजोरा दिला आहे. शिरसाट याप्रकरणी बोलतांना म्हणाले, ''जयंत पाटील यांना शरद पवारांच्या पक्षात करमत नाही. अनेक वर्षे पक्षासोबत राहिल्यानंतर आज जर त्यांना रोहित पवार यांच्या हाताखाली काम करावे लागत असेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव काही नाही आहे. ज्यांनी पक्ष उभारणीत शरद पवारांसोबत आपले आयुष्य पणाला लावले. मात्र पक्षात त्यांचा अपमान होत असेल तर ते का राहतील? म्हणून जयंत पाटील पक्ष सोडणार हे निश्चित आहे'', असे शिरसाट म्हणालेत.दरम्यान, आज प्रसार माध्यमांशी बोलतांना याबाबत विचारले असता नाना पटोले यांनी देखील एक सूचक विधान केले आहे. जयंत पाटील यांच्याबाबत बोलतांना ते म्हणाले, ''निवडणुकीनंतर अजित पवार आणि शिंदे यांचा पक्ष राहील का हा प्रश्न आहे. जे कॉंग्रेस विचारांचे लोक होते ते आता पुन्हा कॉंग्रेसमध्ये येत आहेत. देशासह राज्यात देशात परिवर्तनाची लाट सुरू झाली आहे. हायकमांडकडून याबाबत काही निर्णय घेण्यात आला तर त्या निर्णयाचे आम्ही सर्व जण स्वागत करू'', अशी प्रतिक्रिया पटोले यांनी जयंत पाटील यांच्या कॉंग्रेस प्रवेशाच्या चर्चांवर दिली आहे.

# बारामती लोकसभेसाठी बॅनर वॉर:इंदापुरात सुप्रिया सुळेनंतर 'गुलाल आपलाच' म्हणत झळकले सुनेत्रा पवारांच्या विजयाचे बॅनर

**पुणे (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीच्या निकाला अगोदरचं पुण्याच्या इंदापुरात सुनेत्रा पवार यांच्या विजयाचे बॅनर झळकू लागले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघातुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सुनेत्रा पवार प्रचंड बहुमताने विजयी झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन असा या बॅनरवर उल्लेख आहे. इंदापूर मधील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष वसीम बागवान यांनी हा विजयाचा बॅनर लावला आहे.
दरम्यान इंदापुरात सुप्रिया सुळे यांच्या विजयाचे बॅनर झळकले होते. त्यानंतर आता अजित पवार गटाकडून ही बॅनर बाजी करण्यातआली आहे.इंदापुरात निकालापूर्वी शरद पवार गट आणि अजित पवार गटात बॅनर वॉर रंगल्याचे पहायला मिळत आहे. त्यामुळे निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याआधीच लावलेल्या या बॅनर्सची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे.बारामती लोकसभा मतदारसंघाचा निकाल अधिकृतपणे जाहीर होण्याआधीच मविआच्या कार्यकर्त्यांनी काल (१जून) आपल्या नेत्यावर गुलाल उधळल्याचे दिसत आहे. कारण सुप्रिया सुळेंच्या विजयाचे बॅनर लागले आहेत. तर बॅनरची शहरासह तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. इंदापूर शहरातील ओबीसी सेलचे शहराध्यक्ष मयूर शिंदे यांनी हे बॅनर लावल्याची माहिती मिळत आहे. सुप्रिया सुळेंच्या विजयाचे बॅनर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत.पुणे लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे विजयाचे प्लेक्स लागले आहेत. कोथरूड भागात हे बॅनर्स लावण्यात आले आहेत. लोकसभा खासदारपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन, असा मजकूर या बॅनर्सवर छापण्यात आला आहे.

# प्रयोगांचे माहेरघर - सोमनाथ प्रकल्प

**साठीच्या दशकात कुष्ठरुग्णांनी रोगी शरीर जरी होते तरी त्यांच्या शाबूत निरोगी मनाने आनंदवन आत्मनिर्भर करण्याचा चमत्कार घडवून आणला होता. त्यावेळी बाबांना आणखीन एक चिंता सतावत होती ती म्हणजे युवकांच्या निरोगी शरीरातील, वैफल्याने भरलेल्या रोगी मनाची. त्यांच्या मते, युवकांसाठी पुरातन श्रद्धास्थाने कोसळली होती व नवीन उभी राहिली नव्हती; होती ती फक्त ठिगळे आणि मलमपट्ट्या! शिक्षण म्हणजे माणसाच्या अभिव्यक्तीला वाट करून देणारी प्रक्रिया असं बाबा म्हणत. शिक्षण व्यवस्थेविषयी त्यांची मते तीव्र होती, ते म्हणत, विद्यापीठातून बाहेर पडणारी व्यक्ती फक्त च 'योजक' किंवा फक्त 'उपयोजक' न बनता मेंदू आणि हात वापरणारा 'बुद्धीजीवी व श्रमजीवी' यांची सांगड घालता येणारा असावा. आणि त्याचवेळी सानेगुरुजींच्या प्रेरणेतून सोमनाथ प्रकल्पासाठी बाबांनी वर्कस युनिव्हर्सिटीची संकल्पना मांडली. युवकांनी सोमनाथला यावे नवनवीन प्रयोग करावेत व युवा उर्जा योग्य दिशेने मार्गी लावावी. बुद्धी आणि श्रम यांचा मेळ घालून मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग तरुणांनी जमिनीवरच्या समस्या सोडविण्यासाठी करावा असं बाबांना वाटत होतं आणि त्यातूनच या वर्कर्स युनिव्हार्सिटी म्हणजे 'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठाचा जन्म झाला. विज्ञान व भारतीय जीवन यांचा समन्वय साधत भारताच्या कृषिप्रधान समाजव्यवस्थेला आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने कृषी– आद्योगिक व्यवस्थेचे रूप देणे हा या प्रयोगाचा मुलभूत उद्देश होता.**





प्रचलित शिक्षण पद्धतीमुळे समाज जीवनाच्या वास्तवापासून नकळत दूर गेलेल्या रित्या तरुण मनाला समाजाच्या गाभ्याचा स्पर्श व्हावा यासाठी, अंतर भारती– श्रम संस्कार छावणीची कल्पना बाबांना आली व ही कल्पना सोमनाथ प्रकल्पात,



पहिल्या छावणीच्या माध्यमातून १९६८ सालच्या मे महिन्यात रणरणत्या उन्हात प्रत्यक्षात आली देखील. श्रम संस्कार छावणीच्या' निमित्ताने मे महिन्यातील १५ ते २२ हे आठ दिवस दरवर्षी भारतभरातल्या तरुणांचा जत्था सोमनाथला जमतो व नवनवीन प्रयोगांत सामील होऊन अनुभवांची शिदोरी आपल्या सोबत घेऊन जातो. छावणीतून प्रेरित होऊन अनेक युवकांनी महाराष्ट्रात सामाजिक संस्था उभ्या केल्या आणि समाजाला भेडसावऱ्या विविध समस्यांवर काम करण्यात आज त्या संस्था व्यस्त आहेत. याही वर्षी श्रमसंस्कार छावणीचे नियोजीत आहे. आजच्या परिस्थितीला अनुसरून या छावणीच्या नियोजनाची आखणी केली आहे, त्यातून नक्कीच आजच्या युवा विचारांना नवीन दिशा मिळेल हा ठाम विश्वास आहे.
सोमनाथ, घनदाट ताडोबा जंगलाच्या कुशीत वसले आहे. आजूबाजूला संपूर्ण जंगल असल्यामुळे हा प्रकल्प जैवविविधतेने श्रीमंत आहे. हिंस्त्र प्राण्यांचाही वावर येथे असतो. निसर्ग प्रेमींसाठी तर हा स्वर्गच. वर्षभर येथे वेगवेगळ्या प्रयोगांची आरास मांडलेली असते. सुरुवातीपासून सोमनाथला शेती, शेतीपूरक उद्योग व पाणी यांचे व्यवस्थापन उत्तम होत आले आहे. बाबांनी ६ कुष्ठरुग्ण सोबत घेऊन या कामांचे बीज पेरले होते. आज त्याचा झालेला वटवृक्ष ताठ मानेने उभा आहे. शंकर दादा– सिंधू ताईंना बाबांनी या प्रकल्पाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवली होती. शंकर दादा व त्यांच्या कुष्ठरुग्ण सहकार्यांनी इथेही आनंदवनाप्रमाणे अशक्य कामे शक्य करून दाखविली. तीच धुरा शंकर दादानं नंतर पुढील पिढीचे कार्यकर्ते हरी बढे, अरुण कदम, चंदनखेडे, यांनी समर्थपणे सांभाळली. नुसतीच सांभाळली नाही तर आणखीन नवीन कार्यकर्त्यांना त्यांनी त्यांच्या अनुभवातून तयारही केले. भूषण नेवे अगदी २७ वर्षाचा युवक या सर्वांच्या अनुभवातून सोमनाथ सारख्या दुर्गम भागात आपली पुढची दिशा बघू पाहतोय.
आजही पारंपारिक बिजाई संवर्धित राहावी व शेतकऱ्याला चांगल्या प्रतीची बिजाई मिळावी या अनुषंगाने वेगवेगळे प्रयोग करत आहोत. तसेच येथील जैवविविधता टिकून राहावी या उद्देशाने जंगली झाडांची रोपे तयार करून त्यांची लागवड करणे, तसेच गवतांचे प्रकार, पक्षी, किटक अश्या घटकांचा अभ्यासही त्या त्या विषयातील तज्ज्ञांच्या मदतीने करत आहोत. प्रकल्पातील लोकांसाठी व आजूबाजूच्या गावातील लोकांसाठी आरोग्याच्या सोयी पुरविता याव्यात यासाठी पूर्णवेळ डॉक्टर सेवा देत आहेत, भविष्यात दवाखाना व इतर सोयींची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करत आहोत. निसर्गासाठी पूरक, शिक्षण, आरोग्य, रोजगार या बाबी ध्यानात ठेवून पुढील कामांचा आराखडा आखत आहोत. आजूबाजूच्या गावातील युवकांना व महिलांना रोजगार उपलब्ध व्हावेत यासाठी वेगवेगळे कार्यशाळा आयोजित करून त्यांना प्रशिक्षण ही दिले जाते, जेणे करून राहत्या ठिकाणीच उदरनिर्वाहाचे साधन येथील लोकांना उपलब्ध होईल व स्थलंतराचे प्रमाण कमी होईल. प्रकल्पात होणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांमध्येही या युवकांचा सहभाग वाढावा यासाठी प्रयत्नात असतो आणि त्याचे साध्य म्हणजे नजीकच्या गावातील ३ मुली आज प्रकल्पातील शेतीतील काही प्रयोग यशस्वीपणे सांभाळत आहेत.



योगिनी पाटील
कार्यकर्ता,
(सोमनाथ प्रकल्प)

२० वर्षाच्या युवकापासून तर ८० वर्षाच्या युवकांपर्यत प्रत्येकजण या कामांत आपला हातभार लावत असतो. आधीच्या पिढ्यांचा अनुभव व नवीन पिढीचे बळ, उर्जा, हातात हात धरून येथे काम करतात आणि म्हणून प्रयोगांना यश मिळतेच. हेच प्रयोग व यश शाश्वत असावेत यासाठी अश्याच अनुभवांची व उर्जेची आणखीन गरज आहे. जास्तीत जास्त युवकांपर्यंत या प्रकल्पाची माहिती पोहोचणे काळाची गरज आहे. आज अनेक तरुणांना दिशाहीन होऊन व्यसनांच्या आधीन गेलेली अथवा नैराश्यात गेलेली आपण बघत आहोत आणि म्हणूनच तरुणांना भविष्याची डोळस स्वप्न पाहायला शिकविणारा हा प्लाटफार्म लाखो तरुणांना माहित करून देणे ही आपली समाजिक जबाबदारी आहे. एवढा मोठा व्याप सांभाळताना हजारो हात एकत्र येणे भाग आहे. अविष्कारांच्या या भूमीवर सतत ज्ञानाची व अनुभवांची अदान–प्रदान होत राहावी, तसेच या भूमीवर हजारो तरुणांनी त्यांच्या अनुभवांची गाथा लिहून ठेवली आहे ती आजच्या प्रत्येक युवकापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. विविध क्षेत्रातील शिक्षक, नौकरीचा कार्यकाळ पूर्ण केलेली अनुभवी मंडळी, विविध विषयात शिक्षण घेत असलेला तरुण ज्याला पाठ्यपुस्तकातील ज्ञान वापरात आणून अनुभव मिळवता येईल अश्या प्रत्येकांनी येऊन ही प्रयोगांची मशाल पेटती ठेवणे गरजेचे आहे.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतमोजणीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मंगळवार दि.४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. ३७-अहमदनगर व ३८-शिर्डी लोकसभा मतदार संघासाठी मतमोजणी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, एमआयडीसी, नागापूर, अहमदनगर येथे सकाळी ८ वाजेपासून सुरू होणार आहे. या मतमोजणीसाठी सुमारे एक हजार पाचशे अधिकारी,कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असुन मतमोजणीसाठी सर्व निवडणूक यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक शाखेने दिली आहे.




मतमोजणीसाठी निवडणूक शाखेने सर्व यंत्रणा सज्जता केली आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ हे स्वतः सर्व व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत. ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी गोदाम क्र. १ येथे तर ३८-शिर्डी लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी गोदाम क्र.३ मध्ये होणार आहे.

**एका विधानसभा क्षेत्रासाठी १४ टेबल**

३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघात सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश आहे. त्यात २२२-शेवगाव पाथर्डी, २२३-राहुरी, २२४-पारनेर, २२५-अहमदनगर शहर, २२६-श्रीगोंदा व २२७-कर्जत जामखेड असे सह विधानसभा मतदारसंघ आहेत. तसेच ३८-शिर्डी लोकसभा मतदारसंघात २१६-अकोले, २१७-संगमनेर, २१८-शिर्डी, २१९-कोपरगाव, २२०-श्रीरामपुर व २२१-नेवासा असे एकुण सहा विधानसभा मतदारसंघ आहेत. प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील मतांची मोजणी करण्यासाठी १४ टेबल लावण्यात आले आहेत.

**मतमोजणी फेऱ्या**

विधानसभा मतदार संघ निहाय असणाऱ्या व मतदान केंद्रनिहाय होणाऱ्या मतमोजणी फेऱ्या याप्रमाणे असतील. ३८-शिर्डी लोकसभा मतदारसंघातील २१६-अकोले, ३०७ मतदान केंद्र २२ फेऱ्या, २१७-संगमनेर २७८ मतदान केंद्र २० फेऱ्या, २१८-शिर्डी २७० मतदान केंद्र २० फेऱ्या, २१९-कोपरगाव २७२ मतदान केंद्र २० फेऱ्या, २२०-श्रीरामपुर ३११ मतदान केंद्र २३ फेऱ्या तर २२१- नेवासा २७० मतदान केंद्र २० फेऱ्या होणार आहेत. ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील २२२-शेवगाव पाथर्डी ३६५ मतदान केंद्र २७ फेऱ्या, २२३-राहुरी ३०७ मतदान केंद्र २२ फेऱ्या, २२४-पारनेर ३६५ मतदान केंद्र २७ फेऱ्या,, २२५-अहमदनगर शहर २८८ मतदान केंद्र २१ फेऱ्या, २२६-श्रीगोंदा ३४५ मतदान केंद्र २५ फेऱ्या तर २२७-कर्जत जामखेड ३५६ मतदान केंद्र २६ फेऱ्या होणार आहेत.

**सुरक्षा व्यवस्था**

मतमोजणीसाठी नियुक्त प्रत्येक कर्मचारी, मतमोजणी प्रतिनिधी, निवडणूक प्रतिनिधी, उमेदवार यांना ओळखपत्र देण्यात आले आहेत. मतमोजणी केंद्राची कडक अशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. संपूर्ण मतमोजणी केंद्रावर सीसीटीव्हीद्वारे निगराणी होत आहे. मतमोजणी केंद्रात मोबाईल व पेन घेऊन जाण्यास मनाई करण्यात आली आहे. या शिवाय स्वतंत्र मिडिया कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याद्वारे माध्यम प्रतिनिधींपर्यंत माहिती पोहोचविली जाणार आहे.

### नगरच्या जिव्हाळा प्रतिष्ठानचा राष्ट्रीय शिखर पुरस्काराने गौरव

## जिव्हाळा प्रतिष्ठानचा सामाजिक व शैक्षणिक कार्यात महाराष्ट्रात नवलौकिक -पद्मश्री उमा शंकर पांडे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिव्हाळा प्रतिष्ठाण ने साळी समाजासाठी विनामूल्य वधुवर सुचक वेब साईट तयार करुन १२७ लग्न जमवले आहेत.पक्षांसाठी दाणा पाणी कार्यक्रम,ताणतणाव मुक्ती व आनंदमय जिवन व्याख्यान,जेष्ठ नागरीक सन्मान,जुन्या गाण्याची मैफील,अनाथ आश्रमातील मुला,मुलींना दाबेली प्रशिक्षण,महिलांसाठी हळदी कुंकु,तिळगुळ समारंभ, आरोग्य शिबीरे, गरजु कुटुबांना किराणा व धान्य वाटप,महिलांकरीता टेलरिंग व फॅशन डिझाईन सेमिनार, घटस्फोटित,विधवा,विधुर,अपंग,मूकबधिर विनामूल्य वधुवर मेळावा, गौरी गणपती सजावट स्पर्धा, कोल्हापूर ,सांगली पूरग्रस्तांना ३५००० रु.देणगी,स्त्रीजन्माचे स्वागत कन्यादान योजनेचा ११११रु.धनादेश वाटप



अशा सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करुन जिव्हाळा प्रतिष्ठानने महाराष्ट्रात नावलौकिक मिळविला आहे.असे प्रतिपादन पद्मश्री उमा शंकर पांडे यांनी केले आहे.गोवा पणजी येथे कल्याण ठाणे,येथील ज्ञानरचना सोशल फाउंडेशन तर्फे सामाजिक,शैक्षणिक उल्लेखनीय कार्याबद्दल अ.नगर येथील स्वकुळसाळी समाजाचे जिव्हाळा प्रतिष्ठाण या संस्थेला राष्ट्रीय शिखर पुरस्काराने (इंडियन पिनॅकल नॅशनल अवॉर्ड २०२४)पद्मश्री उमा शंकर पांडे यांचे हस्ते गौरविण्यात आले.याप्रसंगी पुरस्कार स्वीकारताना जिव्हाळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनिल पावले,संस्थापक चंद्रशेखर पिंपरकर,अभिनेत्री आशु सुरपूर,ज्ञानरचना सोशल फाउंडेशन चे डायरेक्टर प्रवीण साळवे,जिव्हाळा प्रतिष्ठानचे संचालक सुभाष यमाजी पाठक,संजय ओहळ,अरुण दळवी,दिलीप शिवगण,नंदकुमार सुपेकर आदी उपस्थित होते. राष्ट्रीय शिखर पुरस्काराबद्दल जिव्हाळा प्रतिष्ठाणचे सचिव सौ.मिना साळी,खजिनदार विठ्ठलराव पाठक, संचालक अभिजित अष्टेकर,सुरेश इंगळे श्री.संजय क्षीरसागर, सौ.शशिकला उगले,सौ.उमा पाटेकर, सुधाकर साळी ,उमेश कोदे व अहमदनगर शहर व उपनगर येथील स्वकुळसाळी समाजातील सर्व संस्थेनी अभिनंदन केले आहे .

## पै.सोमा बोरुडे याने पटकाविली भातोडी पारगावला कुस्तीत चांदीची गदा

### कुस्ती मैदानात जिल्ह्यातील मल्लांची हजेरी

**अहमदनगर । प्रतिनिधी**



भातोडी पारगावच्या यात्रेनिमित्त झालेल्या कुस्ती मैदानात शहरातील मल्ल पै. सोमा सुभाष बोरुडे यांनी मानाच्या कुस्तीत चांदीची गदा पटकावली. बोरुडे यांची कुस्ती ससेवाडी येथील मल्ल पै. गौरव जरे यांच्यात अटीतटीची झाली. यामध्ये बोरुडे याने कुस्ती चितपट करुन मानाची चांदीची गदा मिळवली.पै. सोमा सुभाष बोरुडे याने कुस्तीत चांदीची गदा पटकाविल्याबद्दल नालेगाव येथे जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी पै. अशोक घोडके, नगर तालुका तालिम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, सचिव पै. बाळू भापकर, मिलिंद जपे, काका शेळके, सचिन लांडगे, सुदामा बोरुडे, सागर बेरड आदी उपस्थित होते.भातोडी पारगावच्या यात्रेनिमित्त लाल मातीच्या आखाड्यात थरारक कुस्त्या रंगल्या होत्या. यावेळी जिल्ह्यातील नामवंत मल्लांनी सहभाग नोंदवला. उत्साहपूर्ण वातावरणात युवा मल्लांच्या कुस्त्या पार पडल्या.

# राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर यांच्या नावाने अध्यासन सुरू करण्यासाठी तसेच स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर शहरामध्ये भव्य स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारने सहकार्य करावे आशी मागणी महसूल तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनाच्या निमिताने श्रीक्षेत्र चौंडी येथे आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे केंद्रीय मंत्री रामदास आठवले मंत्री अतुल सावे संजय बनसोडे आ.राम शिंदे आ.मोनिका राजळे आ.गोपीचंद पडळकर जेष्ठ नेते आण्णासाहेब डांगे जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले आदीसह मान्यवर उपस्थित होते.या जिल्ह्याचे नामकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानून मंत्री विखे पाटील म्हणाले की जिल्ह्याच्या दृष्टीने




ऐतिहासिक क्षण आहे.अहील्यादेवीच्या जयंतीचे आता त्रिशताब्दी वर्ष सुरू होत आहे.यानिमिताने या जिल्ह्याची वाटचाल त्यांच्या विचाराने व्हावी यासाठी शहरामध्ये स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर पुण्यश्लोक अहील्यादेवीचे स्मारक उभारण्याचा संकल्प आम्ही केला असून त्या कामालाही सुरूवात झाली आहे.हे स्मारक येणार्या पिढी करीता प्रेरणास्थान ठरेलच परंतू महीलांच्या उत्कर्षाकरीता नवी उर्जा देणारे असेल. या स्मारकाच्या कामाला राज्य सरकारने सहकार्य करावे आशी मागणी विखे पाटील यांनी केली.पुण्यश्लोक अहील्यादेवीच्या कार्याची महती खूप मोठी आहे.त्यांच्या वाटचालीचा इतिहास अजरामर आहे.त्यांच्या कार्याची माहीती अधिक व्यापक स्वरुपात समाजापुढे यावी याकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांच्या नावाचे अध्यासन या वर्षापासून सुरू करण्यासाठी राज्य सरकारने निर्णय करावी आशी विनंती मंत्री विखे पाटील यांनी आपल्या भाषणातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.चौंडी येथील स्मारक उभारणीचे काम १९९५ साली राज्यात युती सरकार असताना झाली.तत्कालीन मुख्यमंत्री स्व.मनोहर जोशी तसेच उपमुख्यमंत्री स्व.गोपीनाथ मुंढे यांचे मोलाचे सहकार्य लाभले याचा आवर्जून उल्लेख करून मंत्री विखे म्हणाले की पालकमंत्री

या नात्याने या स्मारकाच्या कामात योगदान देता आले हे माझे भाग्य आहे.


# शिक्षण क्षेत्रांमध्ये चांगले कार्य करण्यासाठी प्रयत्नशील राहू-सौ.अनूजाताई डोईफोडे

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यपदी झालेली निवड म्हणजे शिक्षणक्षेत्रामध्ये माझ्यावर जी जबाबदारी पडली आहे, त्याचा मी चांगल्या पद्धतीने उपयोग करेल व माझ्या हातून चांगले कार्य करण्यासाठी प्रयत्नशील राहील असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तथा दैनिक प्रजावाणी मधील ' मानसी' या महिलांसाठी चालवल्या जाणाऱ्या साप्ताहिक सदराच्या कृतिशील संपादिका सौ. अनुजाताई शंतनू डोईफोडे यांनी व्यक्त केले.

नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल नांदेड शहरातील सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. तसेच दैनिक प्रजावाणीच्या ६३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून प्रजावाणीचे संपादक शंतनू सुधाकररावजी डोईफोडे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते व माजी उपप्राचार्य प्रा. डॉ. दीपक कासराळीकर, संगीत क्षेत्रातील चिंतनशील व निरपेक्ष भावनेने कार्यरत असणारे डॉ. प्रमोदराव देशपांडे , संत साहित्याचे अभ्यासक अनिल पांपटवार, प्रा. संतोष कुलकर्णी, शारदा संगीत महाविद्यालयाच्या संचालिका सौ. मंजुषाताई देशपांडे , अलकाताई पांपटवार, एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. भाग्यश्री कापरे-कुलकर्णी यांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी बोलताना अनुजाताई डोईफोडे म्हणाल्या, कोव्हिडमुळे ज्या कुटुंबातील कर्त्या पुरुषांचे निधन झाले आहे, अश्या एकल कुटुंब असणाऱ्या महिलांसाठी आम्ही शासनाकडून तीन कोटी रुपयाचे अर्थसहाय्य त्यांच्या खात्यावर जमा केले. प्रत्येक महिलेला पन्नास हजार रुपयाचे अर्थसहाय्य ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. हेरंब कुलकर्णी यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या चळवळीमुळे मिळाले. तळागाळातील एकल महिलांना त्यांच्या मुलांच्या बाल संगोपनासाठी त्यांना मिळालेल्या या आर्थिक मदतीचा उपयोग



कोरोनामुळे उद्धवलेल्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचा उल्लेख त्यांनी यावेळी केला.

यावेळी प्रा. डॉ. दीपक कासराळीकर सरांनी प्रजावाणीचे संस्थापक संपादक स्व. सुधाकररावजी डोईफोडे यांच्या निर्भीड, वस्तुनिष्ठ व समाजहिताच्या पत्रकारितेचा गौरव केला. स्व. सुधाकरराव डोईफोडे यांच्या अभ्यासू पत्रकारितेचा वारसा व परंपरा संपादक शंतनू डोईफोडे समर्थपणे पुढे चालवत आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात दैनिक प्रजावाणीचे नाव मराठवाड्यात व महाराष्ट्रात आदराने घेतले जाते. दैनिक प्रजावाणी वाचल्याशिवाय नांदेडकरांची सकाळ जात नाही. इतर वर्तमानपत्रे वाचली तरी दैनिक प्रजावाणी वाचला नाही तर वाचकांना काहीतरी अर्धवट राहिल्यासारखे वाटते. मानसी पुरवणीच्या संपादिका अनुजाताई डोईफोडे यांनी दर्जेदार साहित्य चिंतनशील व अभ्यासू स्त्री लेखिकांच्या माध्यमातून प्रसिद्ध करून महिलांना व्यक्त करण्यासाठी एक समर्थ व्यासपीठ उभे केले आहे असे सांगून त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

यावेळी पत्रकार प्रा संतोष कुलकर्णी यांनीही दैनिक प्रजावाणीच्या गौरवशाली पत्रकारितेच्या परंपरेचा व स्व. सुधाकररावजी डोईफोडे यांनी केलेल्या मराठवाड्यातील रेल्वे प्रश्न, सिंचन, पाणी प्रश्न, शैक्षणिक प्रश्न, मराठवाड्याच्या विकासाचे प्रकल्प ई. च्या पाठपुराव्याचा व सडेतोड पत्रकारितेचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पांपटवार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.प्रमोद देशपांडे यांनी केले.

# आदिम कोलाम-माडिया तरुणांच्या स्वप्नांना बळ;जागृत संस्थेतर्फे 'जाणीव २०२४' शिबीर

## उच्चशिक्षण,व्यक्तिमत्व विकास,हक्क,अधिकारांवर मंथन









**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशात एकूण ७५ आदिम जनजातीपैकी महाराष्ट्रात कोलाम, कातकरी आणि माडिया या तीन आदिम जनजाती आहेत. त्यात नक्षलप्रभावित गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात आदिम माडिया व चंद्रपूर जिल्ह्यात आदिम कोलाम समुदायाचे वास्तव्य आहे. जल-जंगल-जमिनीशी नाते टिकवून, आपल्या प्रथा-परंपरा-संस्कृतीशी प्रामाणिक राहून या समुदायांची वाटचाल सुरु आहे, या समुदायातील नव्या पिढीत सामाजिक सजगता, शैक्षणिक जागृती व नेतृत्व विकास यास चालना देण्याच्या हेतूने जागृत संस्थेच्या माध्यमातून तीन दिवसीय पहिले आदिम युवा नेतृत्व विकास शिबीर 'जाणीव - २०२४' मोरवा येथील छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय महाविद्यालयात नुकतेच पार पडले. या शिबीरात गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भामरागड तालुक्यातील माडिया व जिवती तालुक्यातील कोलाम समुदायातील ५० युवक-युवती सहभागी झाले.

या तीन दिवसीय शिबिरात डॉ.दिलीप चौधरी, नागपूरचे ड.सचिन मेकाले, युवा प्रश्नांचे अभ्यासक सतिश गिरसावळे, माडिया समाजातील पहिले वकिल ड.लालसू नोगोटी, अझीम प्रेमजी विद्यापीठ बंगलोरचे प्रो. नीरज हातेकर, प्रसिद्ध दिग्दर्शिका प्राचार्य डॉ.जयश्री कापसे, चेव्हनिंग स्कॉलर ड.दीपक चटप, समुपदेशक नागेश मादेशी, राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेते बंडू धोत्रे, गटविकास अधिकारी धनंजय साळवे, एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.बाळू राठोड, सामाजिक कार्यकर्ते चिन्ना महाका, किसन आत्राम यांनी मार्गदर्शन केले. 'जाणीव जगण्याची, उच्चशिक्षणाची, समाज परिवर्तनाची' या थीमवर आयोजित शिबीरात शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, आदिवासींचे कायदे, हक्क, अधिकार, संस्कृती यावर विचारमंथन करण्यात आले. शिबीराच्या आयोजनात जागृत संस्थेचे संचालक, सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोईनकर, वर्षा कोडापे, राम चौधरी, राजू काळंगा, सुरेश कोडापे, भीमराव कोडापे, बुकलू लेखामी, नितेश वाघाडे यांनी परिश्रम घेतले. राज्यात आदिम समाजातील कोलाम व माडिया समाजातील युवकांसाठीचे हे पहिलेच शिबीर ठरले हे विशेष !चंद्रपूर येथील जागृत संस्था ही चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यात आदिम आदिवासी समुदायासोबत त्यांचे हक्क, कायदेविषयक संविधानिक जागरूकता, शिक्षण, संशोधन व ग्रमीण विकास यावर जमिनीस्तरावर जनजागृतीचे कार्य करते. पहिल्यांदाच आयोजित जाणीव शिबीरात गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलप्रभावित भामरागड तालुक्यातील बिनागुंडा, कुवाकोडी येथूनही युवक सहभागी झाली. जिवतीतील अतिदुर्गम भागातून कोलाम समुदायातील मुले सहभागी झाली. शिक्षण-संस्कृतीचे आदान प्रदान दोन्ही आदिम समुदायातील युवकांनी करुन उच्चशिक्षणातून समाज परिवर्तनाचा संकल्प केला.

# आंतररष्ट्रीय सिलंबम स्पर्धे मध्ये सुरज बांगर ची सुवर्ण कामगिरी




**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २४ ते २८ मे दरम्यान मलेशिया येथे झालेल्या आंतररष्ट्रीय सिलंबम स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याच्या भूमीतील गरीब शेतकरी कुटुंबातील सर्वसाधारण असणारे व्यक्तिमत्व दिलीप बांगर यांचा मुलगा असून पाटोदा तालुक्यातील भायाळ या गावचा हा भूमिपुत्र कु.सुरज बांगर याने ५० किलो खालील वजनी गटामध्ये काठी ची लढत (पोरुथल) या खेळ प्रकारात भारतासाठी सुवर्णपदक मिळवले आणि शस्त्र फिरवणे या खेळ प्रकारात कांस्य पदक मिळवले.

या स्पर्धेमध्ये भारत देशा सोबत श्रीलंका, मलेशिया, स्वित्झर्लंड, दुबई, कतार, पाकिस्तान, सिंगापूर, बांगलादेश या देशातील ५०० पेक्षा अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता. भारत देशांमधून १५० खेळाडूचा संघ मलेशिया येथे सहभागी झाला होता. या सुवर्ण कामगिरी साठी प्रशिक्षक संजय बनसोडे यांनी सुरज बांगरच्या यशाबद्दल कौतुक केले. याचबरोबर युवा उद्योजक अशोक दहिफळे यांचा हा भाचा आहे या यशाबद्दल व्यापारी वर्गातही कौतुक केले जात आहे तसेच पाटोदा तालुकाचे सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांनीही सुरज बांगर कौतुक करून शुभेच्छा दिल्या समस्त ग्रामस्थ यांनी सुरज बांगर यांचा सत्कार करण्यात आला.

# सागरी मासेमारी करतांना शेजारी देशांनी पकडलेल्या मच्छिमार बांधवांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्रीय धोरण ठरवावे

## ना.सुधीर मुनगंटीवार यांची पंतप्रधान नरेंद्रजी मोदींकडे पत्राद्वारे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

पाकीस्तानसह भारताच्या शेजारच्या देशांनी पकडून बंदी बनविलेल्या मच्छिमार बांधवाना व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याकरीता राष्ट्रीय धोरण व केंद्रीय अधिनियम निर्माण करावेत अशी मागणी राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तसेच गुजरातच्या मासेमारी नौकांवर कार्यरत महाराष्ट्राच्या मच्छिमार बांधवांना पाकीस्तानने पकडले तर त्यांना गुजरात सरकारने मदत करावी अशी मागणीही अन्य एका पत्राद्वारे गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल यांना पत्र लिहून ना .सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.



भारताला सुमारे साडे सात हजार किमि ची सागरी किनारपट्टी लाभली आहे. त्यामुळे भारताच्या किनारी भागात मासेमारी हा अन्न व रोजगार देणारा एक प्रमुख व्यवसाय आहे. मच्छिमार बांधव सागरी मासेमारी करतांना खोल समुद्रात जातात. मात्र अनेकदा सागरी हद्दी न कळल्याने अनवधानाने शेजारच्या देशाच्या सागरी हद्दीत गेलेल्या मच्छिमार बांधवांना नौकेसह शेजारी देश बंदी बनवतात. अशा मच्छिमार बांधवांना त्यांच्या त्यांच्या राज्यांकडून काही ना काही आर्थिक मदत दिली जाते. मात्र एका राज्यातील मच्छिमार /खलाशी दुसऱ्या राज्यातील मच्छिमार नौकेवर कार्यरत असतील तर अशा मच्छिमारांना/ त्यांच्या कुटुंबियांना त्या राज्याकडून आणि स्वतःच्या मूळ राज्याकडूनही आर्थिक मदत मिळत नाही. त्या बाबत प्रत्येक राज्याच्या शासनादेशात काही ना काही कमतरता

**महाराष्ट्रातील अनेक मच्छिमार बांधव गुजरातच्या मासेमारी नौकांवर काम करतात, त्यांनाही या समस्येला तौंड द्यावे लागते. त्यामुळेच अशा मच्छिमार बांधवांना गुजरात सरकारकडून त्यांच्या धोरणानुसार मदत मिळावी अशी मागणीही ना. मुनगंटीवार यांनी गुजरात सरकारला पत्र लिहून केली आहे.**

आहेत. म्हणून या बाबत एक समान राष्ट्रीय धोरण असावे आणि केंद्रीय अधिनियमांतर्गत अशा शेजारी देंशांच्या बंदीवासात अडकलेल्या मच्छिमार बांधवांना व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे गरजेचे आहे, असे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय मत्स्योद्योग मंत्री परशोत्तम रुपाला यांना पत्रे लिहिली आहेत.

# राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग मागासवर्गीयांच्या हक्क व अधिकारांचे संरक्षण करेल-राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर

## संवाद कार्यक्रम संपन्न;ओबीसींचा एल्गार; राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या पाठीशी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यापुढे ओबीसी आरक्षणाबाबत कोणतेही घोटाळे होणार नाही. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचा प्रभाव व दबाव आता वाढलेला आहे. आयोग ओबीसीबाबत होणाऱ्या सर्व घोटाळ्यावर अंकुश ठेवून आहे. तसे अहवाल तयार करण्यात येत आहेत. शाळा प्रवेश, शिष्यवृत्ती पासून तर नोकर भरती इथपर्यंत आता आयोग लक्ष ठेवून आहे. काही राज्यात होणारे घोटाळे आयोगाने उघडकीस आणले आहे. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग मागासवर्गीयांच्या हक्क व अधिकारांचे संरक्षण करेल, अशी ग्वाही भारत सरकारच्या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी यावेळी आयोजित संवाद कार्यक्रमात दिली.

पं. बंगाल, कर्नाटक व इतर राज्यांनी ओबीसी आरक्षणात केलेले घोटाळे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या माध्यमातून उघड झाले आहे. त्यासंबंधी ओबीसी संघटनांसोबत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांचा ओबीसी संवाद कार्यक्रम आज (दि.१) ला स्थानिक जनता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मधे पार पडला. यावेळी अध्यक्ष स्थानी डॉ. अशोक जीवतोडे उपस्थित होते.

मंचावर प्रमुख अतिथी स्वरूपात ओबीसी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते बबनराव फंड, बबनराव वानखेडे, ज्येष्ठ विधीज्ञ पुरुषोत्तम सातपुते, माजी आमदार ॲड. संजय धोटे, सामाजिक कार्यकर्ते रमेश राजूरकर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नितीन कुकडे, ओबीसी मोर्चाचे विनोद शेरकी आदी उपस्थित होते.या ओबीसी संवाद कार्यक्रमात पूर्व







### ओबीसीतील घुसखोरी खपवून घेणार नाही : विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे

**वारंवार ओबीसी संवर्गातून इतर सधन जाती आरक्षण मागत आहेत. देशातील विविध राज्यात राज्य सरकार मतांचे राजकारण करण्यासाठी धर्माच्या आधारावर सधन जातींना घटनाबाह्यरीत्या ओबीसीत सामावून घेत आहेत. हा खूप मोठा घोटाळा आहे. महाराष्ट्रात मराठा समाज ओबीसीतून आरक्षण मागत आहे. पं. बंगाल, कर्नाटक व इतर राज्यात धर्मानुसार आरक्षण दिल्या जात आहे. ओबीसीतील ही अवैध घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, ओबीसीतून आरक्षण देताना त्या जातीचे मागासलेपण तपासून बघितले पाहिजे, असे विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यावेळी संवाद कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलले**

विदर्भातून ओबीसीतील विविध जात समुदायातील पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.संवाद कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तरे घेण्यात आली. उपस्थित ओबीसी बांधवांनी हंसराज अहिर यांना प्रश्न विचारली, त्या प्रश्नांची यथोचीत उत्तरे देण्याचा प्रयत्न केल्या गेला. या निमित्ताने काही जात संघटनांनी आयोगाच्या अध्यक्षांना निवेदन दिले.कार्यक्रमाला किसनराव गरपल्लीवार, जयजगन्नाथ जंपलवार, विजुभाऊ मुंगले, भुजंग ढोले, राजू बोलमवार, राहुल देवतळे, वंदना संतोषवार, मुग्धा खांडे, अरुणा चौधरी, सारिका संदुरकर, वासमवार, जनार्दन थेटे, अमोल चवरे, रामकृष्ण मंदावार, अशोक रामगिरवार, विवेक कुटेमाटे, केशव थीपे, शंकर काळे, किशोर मोगरे, निकीलेश चामरे, सुरेश धांडे, शिवदास शेंडे, आयुष वासेकर, प्रेमलाल पारधी, अरुण मालेकर, अरुण देऊलकर, नितीन सोनपितरे, देवराव सोनपितरे, चेतन शेंडे, मधुकर घाटे, एन.बी. सूर, आर.एम. शिखरे, टी.एस. भोयर, रमेश बोबडे, चंद्रशेखर बोबडे, निर्मला हेलवटे, एस.पी. सातपुते, एस. व्ही. मोहितकर, एस. व्ही. अडबाले, पी.बी. जांभूळकर, एस.बी. ठावरी, पी.एम. उरकुडे, एम. एल. पानघाटे, डी.एल. कुबडे, एस.एन. टोंगे, एस. डी. गौरकर, पी. डी. आगलावे, आर.एन. ढोके, डी.एम. बोढे, पी. डब्लू. जेनेकर, पी.बी. भोंगळे, पी.एस. पानघाटे, भास्कर जीवतोडे, बंडू लांडे, विठोबा पोले, अमरसिंग बघेल, नरेंद्र धांडे, पिपरे, ताजने, जोगी आदी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. रविकांत वरारकर यांनी केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .